

७

७ आणे.

अमर ज्योति वाङ्मय

अभिनव सत्यकथा - १

# शूरांचा गांव

- आणि इतर कथा -

## ' अमर ज्योति वाङ्मय '

[ स्थापना ५ डिसेंबर १९४३ ]

चालकः—सौ. स्नेहल सामंत, पी. ए.

मुख्य संपादकः श्री. रघुवीर सामंत, बी. ए. बी. टी

५ डिसेंबर १९४३ च्या आमच्या योजना-पत्रकांत **जाहीर केल्याप्रमाणें**, प्रस्तुत ( ' ज्योति-सामंत-स्मारक ' ) संस्थेचा दरवर्षी दिवाळींत धनत्रयोदशीच्या दिवशीं, एकाच गटांत, **लहान मोठीं विविध वाङ्मयाचीं सर्वांग-सुंदर पुष्पें प्रकाशित करण्याचा संकल्प, आज या पहिल्या गटाच्या रूपानें मूर्त स्वरूपांत येत आहे.**

**उगवत्या-वाढत्या पिढीला आनंद-ज्ञान-दायक असें नव्या दृष्टीचें, पद्धतशीर, सात्विक-सोज्वल आदर्श वाङ्मय तज्ञांकडून मुद्दाम लिहवून घेऊन उपलब्ध करून द्यावयाचें** हा या स्मारक संस्थेचा मनोदय आहे. तो अधिक सुलभ व्हावा, म्हणून विषयपरत्वें ' **मनोरंजक** ' व ' **ज्ञान** ' असे आम्ही मुख्य दोन स्थूल विभाग कल्पिले आहेत वयपरत्वें—१ ) ' **शिशुश्रेणी** ' ( वय वर्षें ७ पर्यंत ), ( २ ) **बाल-श्रेणी** ' ( वय वर्षें १२ पर्यंत, ) ( ३ ) '**किशोर श्रेणी** ' ( वय वर्षें १४, ) व ( ४ ) '**कुमार-श्रेणी** ' ( वय वर्षें १७ पर्यंत ) आम्ही सर्वसाधारण चढते टप्पे ठरवले आहेत. आणि याच विषय-विभागांच्या व वयाच्या-टप्प्यांच्या स्थूल आराखड्याचा अधिक सूक्ष्म विचार करून त्यांत बसणाऱ्या सर्व प्रकारच्या विविध आकर्षक पुस्तकांचा दरवर्षीं होणाऱ्या आमच्या असल्या प्रकाशनगटांत समावेश होईल, अशी काळजी घेण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहों.

तथापि, दरवर्षीं होणाऱ्या या ' **दिपावली प्रकाशनां** ' च्या गटाची व्याप्ती सर्व विभागांपर्यंत व सर्व टप्पां--श्रेणींपर्यंत पोहोंचणें, हें संस्थेच्या आदल्या वर्षीच्या प्रकाशनाला मिळणाऱ्या रसिकाश्रयावर, संस्थेच्या स्थिर आर्थिक परिस्थितीवर व त्या त्या वेळच्या भोंवतालच्या अनुकूल प्रतिकूल परिस्थितीवरच अवलंबून रहाणार, हें अर्थातच लक्ष्यांत घेतलें पाहिजे.—तरी पण होतां होईतों **कमींत कमी बारा ते अठरा पुष्पांची गुंफण दर दिवाळींत संस्था करूं शकेल** अशी आमची आज तरी इच्छा-आकांक्षा आहे. आम्हाला तशी उमेद आहे.



# — शूरांचा गांव —

आणि

## इतर कथा

— लेखक —

श्री. रघुवीर सामंत, बी. ए., बी. टी. ( ठाणें )

श्री. वासुदेव त्र्यं. यार्दी, एम. ए., बी. टी. [ प्रिन्सि. 'न्यू. इंग्लिश स्कूल' वसई ]

रघुवीर सामंत संपादित

अमर ज्योति वाङ्मय

[ ७ ]

मूल्य ७ आणे ] धनत्रयोदशी १८६६ [ प्रथमावृत्ति

बसा जीव जगवणें, भीतींचा कां[illegible] उभा राहणें. [५] चेहरा भीती[illegible] पांढरा फटफटीत होणें, दोन गोष्टींत जमीन–अस्मानाचें अंतर अस[illegible] [६] आयुष्य व्यतीत करणें, जिणें कंठणें, एखाद्याच्या हातचा [illegible] खाणें, निगा राखणें, उरले सुरले क्षण मोजणें, जीव कासावीस होणें, [illegible] विरघळणें, एखाद्याचे चोचले करणें, चार भिंतींच्या आसऱ्याला [illegible] असणें, दयेनें प्रेरित होणें, दूर भिरकावून देणें, मेल्याहून मेलें होणें–वा[illegible] [७] देशांतर करणें, सामील होणें, डोळ्यापुढें काजवे चमकणें. [८] कान टवकारून चाहूल घेणें, काळजांत चर्र होणें. [९] एखाद्याच्या नाकीं नव येणें.

## II कथानक, कल्पना, कला वगैरेंचा अभ्यास.

(१) i) रोगाचे जंतू मायावी असतात म्हणजे कसे? संसर्गजन्य रोगांचा प्रतिद्धार कसा करतात? ii) **श्याम** गांवच्या लोकांनीं स्वतःची चित[illegible] रचली म्हणजे काय? त्यांत देशसेवा कसली होती? iii) **श्यामला** 'शूरांचा गांव' कां म्हणायचें? (२) i) **मेनार्डचा** मोठेपणा कशांत होता? ii) 'ही रीतच आहे जगाची!' कोणती रीत?–कशी? iii) आणि बोटीचा बॉयलर फुटतांना **मेनार्डच्या** मनांत शेवटचे विचार कोणते आले असतील ते स्वताच्या कल्पनेनें स्वतःच्या शद्बांत लिहून काढा. (३) i) 'मुलांचा भुयारांत निरुपद्रवी खेळ चालला होता! वाण्याच्या दुकानाचें त्यांचें निरीक्षण फार सूक्ष्म होतें!' या वर्णनांत विशेष काय आहे? ii) प्रसंगावधान म्हणजे काय? या गोष्टींत कोणाचें व कसलें प्रसंगावधान आढळतें? (४) i) 'बिचारा लांकडी पूल थरथर कांपूं लागला!' या वाक्यरचनेंत विशेष काय आहे? या गोष्टींतील असलीं इतर वाक्यें शोधून काढा. अचेतन गोष्टींबद्दल सचेतन विधानें करणाऱ्या वाक्यांचा उपयोग वर्णनाला कोणत्या दृष्टीनें फायदेशीर होतो? iii) 'अबलेचें बल' या नांवांत विशेष काय आहे? त्या दोन दरिद्री जीवांनीं त्यांचा काहीं संबंध नसतां एवढी धडपड कां केली? iv) आगगाडींतल्या लोकांनीं गाडी थांबल्यावर त्या मायलेकींचा गौरव कसा केला असेल त्याचें वर्णन स्वतःच्या कल्पनेनें लिहा (५) i) एखाद्या ट्रिपवर निघण्यापूर्वी, कांहीं संकट येऊं नये म्हणून तुम्हीं आगाऊ व्यवस्था काय कराल? ii) **मेरी** व ट्रिपवर गेलेलीं इतर मुलें यांच्यांत फरक कोणता होता? iii) **मेरी बेन्टन बिलीचा** जीव वांचवूं शकली; तें तिच्या अंगच्या कोणत्या गुणांमुळे व तिला माहीत असलेल्या कोणत्या ज्ञानामळें? (६) i) या गोष्टीला 'मेलेला कुत्रा' हें नांव कां दिलें आहे? ii) **रॉबर्ट** व **मुस्ताफा** या दोघांचे स्वभाव–विशेष आपल्या शब्दांत स्पष्ट करा. iii) **मुस्ताफाचा** मोठेपणा कशात आढळतो? iv) एखाद्या मुक्या प्राण्याच्या नितांत प्रेमाचें उदाहरण तुम्हाला ठाऊक आहे कां? [७] **बोनेचा** पांच वर्षांचा मुलगा बोलला नाहीं यांत विशेष काय होतें? [८] **कॉलिन्सनें** मृत्यूशीं शर्यत कशी केली? (९) **लष्करातल्या** तोंडून 'केवढा प्रताप हा भूतदयेचा!' हे उद्गार कां बाहेर पडले?

या संस्थेच्या कार्यांत फायद्याची विशेष दृष्टी नसली तरी व्यवहार संभाळणें व त्या बाबतींत संभाळून पाऊल टाकणें भाग आहे. **संस्थेला मिळणाऱ्या रसिकाश्रयावर व गुंतलेली रक्कम मोकळी होण्यावरच संस्थेचें प्रत्येक पुढील वर्षाचें कार्य मुख्यतः अवलंबून रहाणार.** तेव्हां (संस्थेला मिळणाऱ्या आश्रयाचा आगाऊ अंदाज येण्यासाठी) **आम्ही 'कायम ग्राहकत्वा'ची योजना उपयुक्त म्हणून मुक्रर केली आहे.** पुस्तकाची कितीही लहान आवृत्ती काढली तरी **ग्राहकांना त्यांची प्रत प्रथम मिळेल.** आणि ती पुन्हां **सामान्य गिऱ्हाइकापेक्षां अधिक सवलतीनें मिळेल.** शेवटीं हा प्रश्न सदिच्छा व सहकार्यावर अवलंबून असल्यामुळें **फक्त मामुली चार आणे प्रवेश फी** घेऊन कोणत्याही मुलामुलीस आम्ही ग्राहकपटावर नोंदवून घेऊं. ग्राहकानें संस्थेतर्फे प्रसिद्ध होणारी **दरवर्षींचीं सर्वच प्रकाशनें विकत घेतलीं पाहिजेत, असा आमचा आग्रह राहणार नाहीं.** (घेतली तर ती त्याला सवलतीनें मिळतीलच.)

मात्र **कोणतीहि गटांतील पांच रुपयाची पुस्तकें नक्त रुपये चार किंमतीस त्याला मिळतील,** तीं पुस्तकें दरवर्षी त्यानें घेतलीं, तरच त्याचें ग्राहकत्व कायम राहून पुढेंहि त्याला सवलत मिळत राहील. **पुस्तकाची किंमत परिस्थितीनुरूप परवडेल तितकी कमीतकमी ठेवणार आहोंत. पण तरीही सामान्य गिऱ्हाईकापेक्षां अधिक सवलत कायम ग्राहकासच मिळणार आहे.** तेव्हां या योजनेचा फायदा घेण्याची इच्छा असणाऱ्या पालकांनीं संस्थेशीं याप्रकारें जरूर सहकार्य करावें.

**प्रथम वर्षाची विशेष फायद्याची 'परिचय सवलत--'**

**या वर्षाच्या एकूण बारा पुष्पांची किंमत रु. ५–१३–० होते.** चार आणे प्रवेश फी भरल्यावर **हींच सर्वांगसुंदर पुस्तकें ग्राहकांना रु. ४–१३–० स पडतील.** पालकांचा नवीन परिचय व्हावा म्हणून व संस्थेच्या ग्राहक योजनेला मूर्त स्वरूप यावें म्हणून (रु. ४-१३-०+०-४ ०=५-१-०) **अशीं एकूण नक्त रु. ५-१-० चीं हीं पुस्तकें, रु. ४–१२–० मनीऑर्डरीनें पाठविल्यास, आमच्या खर्चानें अनरजिस्टर्ड बुकपोस्टानें आमच्या या नवपरिचित ग्राहकाला पाठवून त्याचें नांवही ग्राहकपटावर नोंदवून घेऊं.**

कचेरी:—अमर ज्योति प्रकाशन, १४ बी. हरजीवन एस्टेट, दादर.

कुमार–कुमारींशीं ) हितगुज ★ [ अभिनव–सत्यकथा ]

१–२

हें पुस्तक वाचून झाल्यावर तुम्हाला पटेल, कीं, सत्य हें अनेकदां कल्पितांहून अधिक आश्चर्यकारक असतें. या पुस्तकांतील प्रत्येक कथा मूळांत अगदीं खरीखुरी घडलेली आहे. अशा सत्य घटनाही कलात्मक रीतीनें मांडतां येतात नि त्या तशा मांडल्या तर श्रेष्ठ वाङ्मयांत जमा होतात. किंबहुना प्रत्यक्ष वस्तुस्थितीच्या जोरदार अनुभवावरच खऱ्या उद्‌बोधक कलापूर्ण वाङ्मयाची निर्मिती होऊं शकते.

तुमच्यासमोर असलेल्या या सत्य घटना इतर देशांतल्या आहेत. तरी पण, मानवी स्वभाव जगाच्या पाठीवर सगळीकडे सारखाच असतो; आणि मानवाच्या हातून घडणाऱ्या कृत्यांच्या मोठेपणाची कसोटी एकाच प्रकारची असते. त्या कृत्यांपासून सर्वांना सारखेच धडे घेतां येतात.

'अभिनव सत्यकथे'च्या पुढील भागांत आपल्या देशांतील असल्या श्रेष्ठ उद्‌बोधक सत्यकथांचीही गुंफण आम्ही करणार आहों, एवढें येथें आश्वासन देऊन ठेवतों.

या पुस्तका-शेवटच्या 'भाषा–काला'-इत्यादींच्या अभ्यासाबाबतचें परिशिष्ट जरूर जरूर उपयोगात आणा. त्यामुळें तुमचा फायदा झाल्या-वांचून रहाणार नाहीं.

तुमचा–संपादक
'अमर ज्योति वाङ्मय'

---

–: मुद्रक :–
अनंत वा. देसाई, एम. ए.
लोयल प्रिंटिंग प्रेस,
१३–१९ हमाम स्ट्रीट
फोर्ट, मुंबई,

–: प्रकाशक :–
सौ. स्नेहल सामंत, बी. ए.
चालक–'अमर ज्योति प्रकाशन'
१४ बी. हरजीवनदास एस्टेट
व्हिन्सेन्ट रोड : दादर :
मुंबई १४.

# १–शूरांचा गांव !–

१

इंग्लंडमध्यें डर्बीशायर म्हणून एक प्रांत आहे. त्यांतील 'शिखर प्रदेशां'त **इयाम** म्हणून एक लहानसें खेडें आहे.

हजारों खेड्यांतून या खेड्याचें नांव घेण्याचें तसेंच एक कारण आहे. भयंकर प्लेगनें १६६६ सालीं लंडनमध्यें जो कहर केला, त्यांत या खेड्यानें माणुसकीच्या उच्च तत्वाची कमाल दाखवली. सारं खेडं 'शूरांचं खेडं' 'शूरांचं गांव' ठरलं !—

२

त्यावेळचे त्या खेड्यांतले नेते दोघे होते. **विल्यम मॉम्पेसॉन** व **विल्यम स्टॅनले**. त्यांच्या शब्दाला तिथले सारे आबालवृद्ध वरच्यावर झेलीत. त्यांचें त्या खेड्याचें पुढारीपण अगदीं नैसर्गिक होतें.

लंडनला भयंकर प्लेग सुरूं झाला होता. दिवसाला हजारों माणसें मृत्युमुखीं पडत होतीं. त्या एवढ्या मोठ्या शहाराला स्मशानाचें स्वरूप आलें होतें त्यावेळीं.

वास्तविक, इयाम गांव लंडनपासून दीडशें मैलावर. लंडनच्या प्लेगाचा इयामच्या खेड्याशीं अर्थाअर्थी काय संबंध ?—

पण रोगाचे सूक्ष्म जंतू मोठे मायावी असतात. अदृश्य असले तरी भयंकर प्रतापी असतात. जणूं काय ते सर्वव्यापी ईश्वरच म्हणायचे ! ते बघतां बघतां वाऱ्यावर स्वार होतील नि योजनेच्या योजने उडून जातील.

माणसांच्या खिशांतून, कपड्यांतून, बैलगाडी-आगगाडींतून....जिथून सोय होईल तिथून त्यांचा संचार सुरू होईल !—

म्हणूनच लंडनला निरुपद्रवी दिसणारें पोस्टांत टाकलेलें एक पुडकें इयामला पोहोंचलें; नि ज्या शिंप्याकडे तें पुडकें आलें तो व त्याच्या घरांतील मंडळींची लागण लागली.

लंडनचा प्लेग असा एकदां पोस्टांतून इयामला आला नि त्यानें हां हां म्हणतां इयाम गांवाला ग्रासलें.

## ३

सगळीकडे हाःहाःकार उडाला. लोक गांव सोडून सैरावैरा दूर दूर पळूं लागले. वर्षभरांत प्लेगनें रणकंदन माजवलें.

**मॉम्पेसॉन**, त्याची बायको, त्याची मुलें या काळांत त्या खेड्यांतच होतीं; त्या भयंकर परिस्थितींत आपल्यापरीनें लोकांना पराकाष्ठेची मदत करण्यांतच त्यांचा वेळ जात होता सारा !

पण त्यालाही कांहीं मर्यादा असते. भोंवतालचें भयंकर वातावरण व रात्रंदिवस चाललेल्या स्मशानयात्रा पाहून, शेवटीं **मॉम्पेसॉन**च्या बायकोचा धीर खचला. मनांत वादळ उठलें. व तिनें, 'आपल्या मुलांसकट गांव सोडून आपण जावें'–म्हणून–आपल्या नवऱ्याचें मन वळवण्याची शिकस्त केली.

**मॉम्पेसॉन**च्याही मनांत विचारांचें घनघोर युद्ध झालें. सामाजिक श्रेष्ठ कर्तव्य कीं मृत्युमुखापासून करावयाचा स्वार्थी पळपुटेपणा ?

पण शेवटीं त्यानें बायकोला सांगितलें. 'तूं मुलांना घेऊन जा !– मला येतां येणार नाहीं !....'

बायकोही तशीच खंबीर होती !–ती म्हणाली–"तुम्ही नाहीं तर मग आम्हीही कोणी नाहीं कुठें जाणार !—"



आणि शेवटीं तें कुटुंब 'आपल्या भोंवतालच्या लोकांचें नशीब तेंच आपलें'....असा विचार करून त्यांची शुश्रूषा करीत पुढेंही तसेंच त्या खेड्यांत राहिलें.

## ४

इकडे प्लेग तर अधिकाधिकच बळकट ठाणें देऊन, आपल्या बळींची संख्या दिवसानुदिवस फुगवीत होता. भीती अशी होती, कीं, **इयाम** गांव सोडून पळून जाणाऱ्या लोकांच्या संसर्गानें आणखी भोंवतालची खेडींही प्लेगला बळी पडतात कीं काय ?–तसें झालें, कीं, इंग्लंडचा सारा उत्तर प्रदेशही प्लेगनें उध्वस्त होणार ! !–

इतक्या थराला गोष्टी गेल्यावर, त्या खेड्याचे ते दोघे नेते–**विल्यम मॉम्पेसॉन** व **विल्यम स्टॅनले**–अधिकाधिक खोल विचार करूं लागले. बऱ्याच विचारानंतर, शेवटीं त्यांनीं एक भयंकर निर्णय ठरवला व त्याप्रमाणें वागण्याचेंही ठरवलें.

साऱ्या गांवकऱ्यांना त्यांनी कळवलें कीं,–"आपल्या देशांतील इतर प्रजेच्या सुरक्षिततेसाठीं आपण आपलें नशिब, आपला मृत्यू, धिम्मेपणें धीरानें कवटाळणेंच योग्य होईल. म्हणूनच गांवचें चर्च बंद करायचें, एका गुहेजवळ फार तर लोकांनीं एकमेकांना धीर देण्यासाठीं रोज जमायचें. सर्व धंदे बंद करायचे, प्रत्येकानें आपलें काम बंद करायचें, शाळांना कुलपें ठोकायचीं; आणि प्रत्येक घर आजारी माणसांवर उपचार करणारें व सुश्रूषा करणारें हॉस्पिटल व्हायचें. कोणाला गांवांत शिरकाव करूं द्यावयाचा नाहीं. कोणीही कोणत्याही परिस्थितींत गांवाबाहेर पाऊल टाकायचें नाहीं. या काळांत सर्व स्त्रीपुरुषांचें काम एकच असायचें— आजाऱ्यांची सुश्रूषा !—"

सर्व गांवकऱ्यांनीं आपल्या नेत्यांचा तो शब्द उचलून धरला ! ठरल्याप्रमाणें तत्काळ आचरणाला सुरवात झाली. सर्व नियम तंतोतंत अमलांत आले.

## ५

असे चार महिने गेले. त्या खेडेगांवांतले उरले सुरले सारे लोक असल्या कडेकोट बंद केलेल्या मृत्यूच्या खायींत (जून १६६६ ते ऑक्टोबर १६६६ या काळांत) जणूं काय जिवंत पुरले गेले होते.

या अवधींत जगांतलेंच काय पण शेजारच्या खेड्यांतलेंही कसलें वर्तमान तेथील लोकांस कळावयास मार्ग नव्हता. जाणून बुजून साऱ्या खेड्यानें तशी आपली चिताच रचली होती.

जूलैमध्यें ५६ लोकांनीं मृत्यूला कवटाळलें. ऑगस्टमध्यें ७२ प्लेगनें ओढून नेलें. (त्यांतच **कॅथेरिन मॅम्पेसॉन** ही शूर स्त्रीही होती.) सप्टेंबरमध्यें आणखी बळी पडले.

पण **इयाम** गांव हरलें नाहीं. तें मृत्यूशीं व प्लेगशीं दोन्ही हातांनीं झगडत होतें.

## ६

शेवटीं ऑक्टोबरच्या मध्यावर प्लेग एकाएकी थांबला. पण **इयाम** मधलें एकही कुटुंब शाबूत राहिलें नव्हतें.

तीनशें लोकांपैकीं दोनशें एकूण साठ लोक, त्या खेड्याला अजरामर करून, इहलोक सोडून गेले होते.

आपल्या दूरच्या बांधवांनीं जिवंत रहावें म्हणूनच त्या खेडेगांवच्या लोकांनीं स्वतः मरावयाचें पत्करलें होतें. मेलेले व जिवंत दोन्ही शूर होते.

**इयाम** खेड्यानें जगाला दाखवलें, कीं, 'देशभक्ति', 'आमचा देश' 'आमचे शत्रू' असल्या ललकाऱ्या मारून एकमेकांचे गळे कापण्यांत, एकमेकांची घरेंदारें-देशाचे देश उध्वस्त करण्यांतच फक्त शौर्य नसतें!....

शौर्य आपल्या घरांतही दाखवतां येतें!...दुसऱ्याला मारूनच नव्हे —स्वतः मरूनही दाखवतां येतें !!

---



# २-जीविताचें सुकाणूं-

समुद्राचा तो पृष्ठभाग धोक्याचा होता. पण ती बोट शीरसलामत प्रवासाच्या शेवटाला आली होती.

हवा चांगली होती. पण भोंवतीं अफाट समुद्र व काळोखी रात्र पसरली होती. त्या काळोखांत थोड्या अंतरावरचेंही दिसत नव्हतें. आकाशांतले तारेही क्वचितच दिसत होते. बोटींतल्या दिव्यांचा अंधुक प्रकाश दाट काळोखांत कुठल्या कुठें विरून जात होता.

समुद्राची मंद गंभीर सळसळ व त्यांतच मिसळणारी बोटीच्या पंख्यांची पाण्यांतील चपळ खळबळ, याशिवाय कसला आवाज नव्हता. आंतले प्रवासी निश्चिंत मनानें आपापल्या जागांवर शांतपणें झोंपले होते.

'घर जवळ आलें !....आतां आनंद !' ही एकच भावना साऱ्या जागृत-निद्रित जीवांच्या मनांत होती. कोणाच्या स्वप्नांतही कसल्या भयंकर प्रसंगाचा हासभास नव्हता.

स्वतः कप्तान सुद्धां दिवसभराच्या कामानें श्रमित होऊन आपल्या कॅबिनमध्यें झोंपी गेला होता.

नाहीं म्हणायला सुकाणूं धरून जागरूक दक्षतेनें आपलें कर्तव्य पार पाडीत असलेला **जॉन मेनार्ड** तेवढा जागा होता. सुकाणू धरणाऱ्या त्याच्या दृष्टीसमोर त्याला त्याची प्रिय पत्नी गोड मुलगा यांच्या हालचाली दिसत होत्या. त्यांना घरीं सोडून तो आपल्या या कामगिरीवर बाहेर पडला होता. असल्या मधल्या वियोगानंतर तो पुन्हां त्यांना केव्हां तरी आनंदानें भेटणार होता !—

बोट....व त्याबरोबरच **मेनार्ड**च्या मनांतील विचार, भोंवतालच्या काळोखांतून किनाऱ्याकडे वाट काढीत पुढे जात होते !

* * * *

## २

पण एकाएकी त्या काळोखांत, त्या शांततेंत, एक भयानक आरोळी उठली—" आग !—आग ! "

बघतां बघतां काळोख नाहींसा झाला होता. सर्वांचे भीतीग्रस्त भयानक भकास चेहेरे त्या भीषण लालसर उजेडांत स्पष्टपणें दिसूं लागले होते. समुद्राच्या संथ सळसळींत व पंख्या-एंजिनच्या अखंड धडधडींत, हृदयाचे लचके तोडणाऱ्या पेटत्या भयानक आगीची आतां भर पडली होती. हवेंत ठिणग्या उडत होत्या. विस्तव पाण्याच्या लढाईची सुरसुर ऐकूं येत होती.

इतक्यांत, कप्तान धावपळ करणाऱ्या प्रवाशांना मोठ्यानें ओरडून म्हणाला—" ऐका ऐका !—दहा मिनिटांत आपण बहुतेक किनारा गाठूंच ! बावरूं नका !—सुकाणूंवाल्यावर सारं अवलंबून आहे. तो आपल्या ठिकाणीं आपलें कार्य करीत खिळून राहिला कीं कसला धोका नाहीं !—शांत व्हा ! !...."

आणि मग सुकाणूच्या बाजूकडे वळून कप्तान ओरडला—"आहेस ना **मेनार्ड** आपल्या जागेवर तूं ? "—

" होय होय !—आहे ना मी इथं ! " क्षणाचाही विलंब न लावतां **मेनार्ड**चें उत्तर त्या शांततेंत दुमदुमलें.

काय जादू भरली होती त्या मोजक्या शब्दांत ? तो शब्द उच्चारतांना उठलेल्या आत्मविश्वासाच्या आंदोलनांत ? सर्व लागलींच शांत झाले !—

"फक्त दहा मिनिटें—सर्वांनीं जगण्यासाठीं—फक्त दहा मिनिटें !—हो, फक्त दहाच मिनिटें ! !...."

सुकाणूं धरल्या धरल्या **मेनार्ड**च्या डोळ्यापुढें सुखद दृश्यें दिसूं लागलीं !—आणि त्याच वेळीं आपल्या चिमुकल्यांना प्रेमानें पुन्हां पुन्हां



कवटाळून त्यांच्यावर हसत हसत चुंबनाचा वर्षाव करणाऱ्या जवळपास असलेल्या आयाही त्याच्याभोंवतीं त्याला दिसूं लागल्या.

## ३

अथांग जलपृष्ठावर वेगानें धावणाऱ्या आगीच्या गोळ्याप्रमाणें ती बोट आतां लांबून पहाणाऱ्याला दिसत होती. मृत्यूबरोबर तिची भरधांव शर्यत चालली होती !—

आंतल्या माणसांच्या मनांत घनघोर युद्ध चाललें होतें. त्यांची हृदयें धडधडत होतीं !—" पोहोचूं ना आपण वेळेवर किनाऱ्याला ?—होईल ना आपली सोडवणूक या संकटांतून ?—"

मिनिटा मिनिटाला लळलळत्या ज्वाला तर सारख्या अधिकच भटकत होत्या !—

प्रत्येकाचें लक्ष सुकाणूकडे होतें—' आहेना तो अजून तिथें ? ' तोंच कप्तान पुन्हां मोठ्यानें म्हणाला—"**मेनार्ड**, बेटा आहेस ना तिथें ?",

पण उलट उत्तर आलें नाहीं !—

सर्व प्रवाशांना आपण हजारों योजनें खालीं खालीं घरंगळत गेल्याचा क्षणभर भास झाला. आणि एकच हलकल्लोळ झाला.

ते निराश होऊन सैरावैरा पळूं लागणार, इतक्यांत,....सुकाणूच्या बाजूनें दबला आवाज आला—" माझ्यानें होईल तें मी करतोंय् ! काळजी नका करूं !..."

तो आवाजही इतका खोल, आंत गेलेला होता....इतका घुसमटल्यासारखा होता, कीं, मघाच्या **मेनार्ड**चाच का तो आवाज याबद्दल साऱ्यांना संशय वाटावा.

## ४

पण तेवढ्यांत, किनाऱ्याचे दिवे जवळ दिसूं लागले; सर्वच आनंदानें एकदां ओरडले. त्यांचा आनंद गगनांत मावेना....मृत्यूबरोबर सुरूं झालेली शर्यत त्यांनीं जिंकली होती.

आतां किनाऱ्यावरील माणसांची हालचाल, घरें, रस्त्यांतील वर्दळ सारें सारें दिसूं लागलें होतें. माणसांना सोडवून नेण्यासाठीं पुढें आलेल्या नावा त्या बोटीभोंवतीं फिरूं लागल्या होत्या !

ज्वाला–धुरामधून मेनार्डलाही तें सर्व दृश्य दिसत होतें. नवरा-बायकोची भेट....आई–मुलांचें वत्सल प्रेम....सारें सारें त्याला दिसत होतें.

त्याची बायको दूर दूर होती–कदाचित्, या इकडच्या प्रकारची कल्पनाही नसल्यामुळें, ती आपल्या मुलाप्रमाणेंच गाढ झोपी गेलेली असेल !—आपली प्रिय पत्नी !–आपला छबडा ! !...."

५

धोका संपला....लोक किनाऱ्यावर अगर सुरक्षित बोटींत उतरले !

आतां त्या जळत्या बोटीचा सुकाणूं अगर सुकाणूवाला यांचा विचारही कोणा प्रवाशाच्या मनांत आला नव्हता !–येत नव्हता !

पण ही रीतच आहे जगाची !

किनाऱ्यावर लाखों लोक जमून त्या मोठ्या जळत्या पण तरंगत्या बोटीचे डोळे दिपवणारें दृश्य पहात होतें.

६

सर्व प्रवासी धोक्यांतून दूर होत आहेत–नाहींत, तोंच एक कानठळ्या बसणारा भयंकर आवाज होऊन त्या जळत्या बोटीचा बॉयलर खाडकन् फुटला. त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या !

—आणि त्याबरोबरच शेवटपर्यंत सुकाणूं संभाळणाऱ्या मेनार्डच्या शरिराच्याही चिंधडया चिंधडया होऊन हवेंत विरल्या !

पण ळळलळत्या ज्वाळांतून व घुसमटविणाऱ्या धुरांतून सुकाणूवर हात ठेवलेल्या मेनार्डचा तो धीरगंभीर चेहरा त्या बोटीवरून शीरसलामत सुटलेल्या कित्येक वर्षे पुन्हां पुन्हां झोंपेतून अनेकदां खडबडून जागा करी ! !....

★



# ३–"दुकान, दुकान !–"

बंदुकीची दारू तयार करणाऱ्या एका कारखानेवाल्याकडे एक तरुण मुलगा कामधंदा शिकायला राहिला होता. त्याच्यावर त्या कारखानेवाल्याचा फार लोभ होता. विश्वासही होता. कधीं कधीं तो आपला सारा कारखाना व दुकान त्या चलाख तरुणाच्या अंगावर सोंपवून कामाला बाहेरगांवींही निघून जाई.

एके दिवशीं कांहीं कामानिमित्त कारखानेवाला आपल्या बायकोसह शेजारच्या गांवीं निघून गेला. आपलें दुकान, कारखाना व चार मुलें एका दिवसापुरती तो आपला शिष्य संभाळील अशी त्यांना जातांना खात्री होती.

२

सकाळपासून सारें सुरळीत चाललें होतें. गिऱ्हाईकें येत जात होतीं. त्यांना मालक नसल्याची आठवणही होत नव्हती. दुकानाजवळच्याच खोलींत तीं मुलेंही आनंदांत खेळत होतीं. त्यांनाही आपल्या आईबापाची आठवण होत नव्हती.

पण एका गिऱ्हाइकाबरोबर बोलतां बोलतां तो एकदम दचकला. पांच मिनिटांपूर्वींच तिथें खेळत असलेल्या मुलांची जवळपास जाग नव्हती. त्यांचा अगदीं दूर दूर खोल खोल हसण्या-खिदळण्याचा आवाज ऐकूं येत होता.

तो घाबऱ्या घाबऱ्या मागें गेला. त्यानें मोठमोठ्यानें आपल्या मालकाच्या मुलांना हांका मारल्या.

क्षणभऱ्यानें साऱ्या मुलांचा लांबून दबला आवाज ऐकूं आला—

" हो हो ! आम्ही इकडे आहों....खेळतोय् आम्ही !–दुकान–दुकान !!

तो अधिकच गोंधळला. आवाज व हसणें आंतून जमीनींतून—दारुचें कोठार असलेल्या भुयारांतून येत होता. तो दबदबा धांवतच भुयाराच्या शिडीजवळ गेला.

त्यानें खालीं वांकून पाहिलें. आणि त्याच्या साऱ्या अंगाला कांपरें भरलें.

मुलें 'दुकान दुकान' खेळत होतीं—खेळ निरुपद्रवी होता. पण तो दारुच्या भुयारांत चालला होता; नि दुकानांत उजेड पडावा म्हणून त्या अजाण मुलांनीं आंत मेणबत्ती पेटवली होती.

३

तो जीव मुठींत धरून शिडीवरून खालीं उतरला. 'ही साखर' 'हा चहा—' असें म्हणत मुलांनीं बंदुकीच्या दारुचे लहान लहान ढिगले केले होते. व त्यांची हसत खेळत खरेदी—विक्री चालली होती. तीं 'चहा'—'साखरे'च्या पुड्या बांधत होतीं. वाण्याच्या दुकानाचें त्यांचें निरीक्षण चांगलेंच सूक्ष्म होतें.

पण त्याहून अधिक म्हणजे त्या मुलांना सांपडलेला एक मेणबत्तीचा लहानसा तुकडा पेटवून एका दारूच्या अर्ध्या उघड्या पिंपाच्या झांकणावर त्यांनीं तो जळता ठेवला होता! कोणत्याही क्षणीं, त्यांच्यासकट दुकाना—कारखान्यासकट सर्वांचा भडका होणें शक्य होतें.

त्याच्या छातींत धस्स झालें. अंगावर, रोमांच उभे राहिले—अंगाला डबडबून घाम सुटला....

४

पण एका क्षणांत त्यानें भयंकर प्रयास करून मनावर ताबा मिळवला. प्रसंगावधान व धैर्य यांच्या बळावरच सर्व वांचली तर वांचणं शक्य होतें....



जणूं काय कांहींच भयंकर झालें नाहीं,....चुकलें नाहीं,....असें प्रयासानें नाटक करीत, तो तरुण त्या खेळांत गढलेल्या मुलांजवळ जात म्हणाला—" अरे....जा....आई—बाबा आले वाटतं परत !—जा पळा रस्त्याकडे !—"

अगदीं योग्य होते ते शब्द !—त्या मुलांचे डोळे आईबापांच्या वाटेलाच लागले होते. सर्व कांहीं होतें तिथेंच टाकून मुलें....शिडीवर झपझप चढत पळूं लागलीं...

निदान तीं मुलें तरीं सुरक्षित ठेवण्याचा त्याचा प्रयत्न होता तो ! कारण मेणबत्ती अगदीं शेवटच्या टोंकापर्यंत येऊन पोहोंचली होती. ती मुलें बोलत तिथें रहातीं तर त्यांचा जीव धोक्यांत होता.

पावलांच्या व मुलांच्या कुजबुजीच्या चाहुलीवरून त्याची जेव्हां खात्री झाली, कीं, मुलें रस्त्यापर्यंत पोहोंचलीं....तेव्हांच तो धडधडत्या छातीनें पुढें झाला.

५

मेणबत्तीची वात तर मोठी होऊन भयानक हेलकावे खात होती. झाकण लाकडाचें....वर दारू सांडलेली, व खालचे सारें पिंप तर तोंडोतोंड दारूनेंच भरलेलें ! पुन्हा मुलांनीं मांडलेलें 'चहा—साखरेचें दुकान' भोवतीं अस्ताव्यस्त पडलेलें !

त्यानें हलकेंच हात पुढें केला. मेणबत्तीचा पैशासारखा चपटा वाटोळा तुकडा त्यानें घट्ट हातांत धरला. त्याचा हात ज्योतीनें पोळत होता—वितळलेल्या मेणाचे त्याला चटके बसत होते; पण ती विझवण्याचा अगर दुसरीकडे कुठें ठेवण्याचा धोकेबाज प्रयत्न न करतां तो तसाच पुढें झाला. हात जळतपोळत असूनही त्या भुयाराची शिडी धिम्मेपणें तो चढूं लागला.

६

शिडी चढून वर आल्यावरच त्यानें एक सुटकेचा सुस्कारा टाकला. त्यानें आपल्या शांत डोक्यानें व खंबीर मनानेंच त्याचा मालकाला, त्याच्या मुलांना, स्वतःला, साऱ्यांनाचं त्या भयानक अनर्थातून त्या दिवशीं वाचवलें होतें.

त्यानें शिडीवरून मुलांकडे खालीं डोकावून पाहिलें, तेव्हांपासून तो आतां तो पुन्हां वर येईपर्यंतच्या मधल्या काळांत, तो कोणत्याही क्षणीं जरा देखील डगमगला असता, तर साऱ्या आळींतल्याही कोणाचा कदाचित् मागमूस उरला नसता !—

मालकाचीं मुलें, दुकान, कारखाना, आपण स्वतः,....साऱ्यांवरील तें गंडांतर टळलें; मग त्याला पांच मिनिटांपूर्वीं कोठारांत खेळत असलेल्या त्या मुलांचा निष्पाप खेळ आठवला व त्यांचे ते बालिश निरुपद्रवी उद्गार त्याच्या पुन्हा कानीं पडूं लागले—"खेळतोंय् आम्ही—दुकान !—दुकान !!"

---

# ४—अबलेचें बल !—

तिथून जरा एक वांकडें वळण घेतलें, कीं, वाटेंतच एक खोल खोल दरी येत होती. तिच्यांतून आडवी वहाणारी नदी फार मोठी नव्हती; पण शेंकडों फूट खालीं भयानकपणें तुटलेले त्या दरीचें तट आगगाडीचा सरळ रस्ता थोडक्यासाठीं मध्येंच तोडीत होते.

म्हणूनच रेल्वे कंपनीनें व्हर्जिनिआ संस्थानांतील त्या दरीवर एक साधारण भक्कम लांकडी पूल बांधून रूळ पुढें नेले होते. आणि त्यामुळें आगगाडीच्या बाल्टिमोर ते ओहिओपर्यंतच्या वेगवान् दळणवळणाची अतिशय सोय झाली होती !—



भोंवतीं अगदीं निर्जन प्रदेश होता. जवळपास अलीकडे पलीकडे मैल न् मैल कुठलेंच लहान-मोठें स्टेशन नव्हतें. म्हणूनच आगगाडी तेथून अत्यंत वेगानें, झपाट्यानें खाड् खाड् करीत पुढें निघून जाई.... त्या पुलावरून ती तशी जाऊं लागली, कीं, त्या दरींत तिचा आवाज नेहमीं घुमे. व त्या चोहोंबाजूंच्या शांततेंत तो किती तरी वेळ प्रतिध्वनितही होई.

जवळपास सिग्नल नव्हते. त्या काळीं तारायंत्रानें संदेश पोहोंचविण्याचें साधनही उपलब्ध नव्हतें.

पण त्या निर्जन भागाची कदर न करतां गाडी मोठ्या चढेल विजयी वेगानें त्या प्रदेशाला कस्पटाप्रमाणें तुडवून नेहमीं पुढें जाई.

२

आजची परिस्थिति वेगळीच मात्र होती. तो मार्च महिना होता. वारा सोसाट्याचा सुटला होता. जवळच्या हिमपर्वतांवरील बर्फ वितळला होता. पुलाखालून जाणाऱ्या नदीला पूर भरत होता.

प्रत्येक घटकेला पूर वाढत वाढत, शेवटीं संध्याकाळीं नदी तुडुंब भरली; त्या लांकडी पुलाला प्रथम चाटत, मग तर घमेंडखोरपणें धक्के देत ती वाहूं लागली होती. त्या भयानक प्रवाहाचा खळखळाट आसपास जोरानें ऐकूं येत होता. जवळपासच्या पशुपक्षांच्या हृदयांतही त्यामुळें धडकी भरत होती.

सांजा काळवंडल्या. घनदाट काळोख झाला. पुराला जोरच भरत होता. बिचारा लांकडी पूल थरथर कांपूं लागला होता.

शेवटीं, मध्यरात्रींच्या घनघोर काळोखांत, एक 'धडड्डधुम्' असा भयानक व कानठळ्या बसविणारा आवाज झाला !...

पुराचा मारा अगदीं असह्य झाल्यावर, त्या लांकडी पुलानें आपल्या खालच्या पाण्यानें तुडुंब भरलेल्या दरींत उडी मारून, आत्महत्या केली होती. त्यावरील रुळांचा चकाचूर झाला होता.

## ३

पण अगदीं वेळच्यावेळीं त्या निर्जन अरण्यांतून दिमाखानें धांवत, तो पूल ओलांडून, धाडधाड् करत निघून जाणाऱ्या गाडीला त्याची काय कल्पना असणार ?....

तेथें माणसें असतीं, तारायंत्रें असतीं, तर आधल्या स्टेशनाकडे भयसूचक संदेश पाठवला जाता. तेथें सिग्नल असते तर उभे करतां आले असते. पशुपक्षांना बोलतां आलें असतें तर धांवत—उडत पुढें जाऊन त्यांनीं त्या धांवत येणाऱ्या गाडीला इशारा दिला असता !....

पण त्यांतले कांहींच होणें शक्य नव्हतें. आणखी अर्ध्या तासानें नेहमीप्रमाणें गाडी भयानक वेगानें तो प्रदेश तुडवीत त्या वळणावर फिरून पुढें जाणार होती !—

पुढें ? म्हणजे त्या लांकडी पुलाकडे !....लाकडी पुलाकडे ?— म्हणजे आज त्या खोल खोल दरीकडे !....त्या फोंफावून वहाणाऱ्या भयानक पुराकडे ! !....

—आणि मग ?—कल्पना नसतांना—त्यां धांवत्या गाडीबरोबरच त्यांतील शेकडों स्त्री–पुरुष–मुलें–त्या खोल दरींत....त्या तुडुंब....खोल खोल पुरांत धाडकन् पडणार होती !....त्यांचा चेंदामेंदा होणार होता !....

....त्यावेळची त्यांची शेवटची धांवपळ,....जीव जगवण्याची असहाय्य धडपड....आरोळ्या....किंकाळ्या !....छे !....कल्पना करणेंही अगदीं अशक्य ! !....

तें तसें भयानक घडण्यावांचून दुसरें कांहींच शक्य नव्हतें कां ?— कोणाला इशारा देणेंच शक्य नव्हतें कां ?—

## ४

होतें !—पण फार बिकट—



त्याच निर्जन अरण्यांत, दोनच उपेक्षित दुर्लक्षित जीव, आपला जीव जगवीत असत. एक अगदीं गरीब विधवा व दुसरी तिची तरुण उपवर मुलगी.

त्यांच्या घरापासून थोड्या अंतरावरूनच तो आगगाडीचा फांटा जात होता. रोज त्यांना रात्रीं गाडीची उद्दाम धडधड जागी करी....त्या गाडीला, त्या गाडींतील माणसांना, त्या निर्जन भागांतील त्या दोन जीवांच्या अस्तित्वाची जरा देखील जाणीव नसे....

त्या मायलेकी काबाडकष्ट करून पोट भरत; तेथें एकाकी रहात त्यांची मोडकी तोडकी लांकडी झोंपडी तिथें होती. आसपास पांच चार मैलांच्या टापूंत इतर माणसांची जागही नव्हती.

आज दुपारपासून निसर्गानें घेतलेले अक्राळविक्राळ स्वरुप पाहून त्या स्वतःच्याच जिवांना घाबरल्या होत्या.

पूर वाढत वाढत जाऊन शेवटीं मध्यरात्रीच्या शांततेंत पुलानें दरींत उडी घेतल्याच्या आवाजानें त्या दचकून जाग्या झाल्या,....त्या प्रथम स्वतःच्या जिवाला घाबरूनच !....

## ५

पण मानवी मन मोठें गुंतागुंतीचें !—तत्काळ त्या विधवेच्या अंगावर भीतीचा कांटा उभा राहिला ! ती भीती एकाच विचाराची....एकाच जाणीवेची !—आतां अर्ध्या पाऊण तासानें नेहमीप्रमाणें ती गाडी धडधडत वेगानें पुढें निघून जाणार होती. आणि मग ?....बापरे—

" आपण गरीब असलों तरी दोन जिवंत माणसें इथें रहात आहों ! आज गाडीला केवढा भयंकर धोका आहे तें आपल्या एकट्यालाच फक्त ठाऊक आहे !....

—"मग आपण कांहींच कां करूं शकणार नाहीं ?

"आपण ओरडा केला तर?–छे–त्या गाडीच्या धडधडाटांत कोणाला तो ऐकूं जाणार?....खुणा करून थांबायला सांगितलें तर?–धांवत्या गाडीच्या इंजन ड्रायव्हरला त्या गडद काळोखांत तें कुठलें दिसायला? नि दिसलं तरी कदाचित् तो आपल्याला वेड्यांतच जमा करील!...."

रुळाजवळ त्या दोघी मायलेकी विचार करीत होत्या. शेवटीं, हतबलपणें निश्वास टाकून व कपाळावर हात घेऊन त्या तसल्याच धडधडत्या छातीनें गप्प बसल्या!

## ६

इतक्यांत आईला एकदम कल्पना सुचली.

एकच उपाय होता. 'त्या काळोखांत कसला तरी उजेड केला तर ड्रायव्हरचें लक्ष वेधेल!'–नुसता उजेड नव्हे–मोठा उजेड!—

कल्पना चांगली होती. पण दरिद्री माणसाच्या कल्पनांच्याही वाटेंत हजारों विघ्नें असतात!—

उजेड दाखवायला तिच्या झोंपडींत दिवटीशिवाय कांहीं नव्हतें आणि त्या भरभरणाऱ्या वाऱ्यांत दिवटी पेटती रहाणेंही अशक्य होतें!

तिनें पुन्हां निश्वास सोडला....पण धीर सोडला नाहीं....तिला पटकन् कल्पना सुचली....मोठा जाळ करावा....

पण जाळ करायला झोंपडींत सर्पण नव्हतें. गोळा करून आणण्याइतका वेळ नव्हता. आतां सारी पंधरा मिनिटें उरलीं होतीं. तीं गेलीं, कीं, गाडी भरधांव येणार!....नि मग?—

तेवढ्यांत, एका नव्या कल्पनेनें ती झटकन् जागची उठली. आपल्या जवळच हतबलपणें बसलेल्या मुलीला तिनें हांक मारली; तिच्या बकोटीला धरलें व ती आपल्या झोंपडीकडे धांवत सुटली!...



## ७

तिची मुलगी तिच्यामागून धांवत होती; पण आईच्या मनांत काय असावें, हें तिच्या गोंधळलेल्या मनाला समजत नव्हतें.

पण तेवढ्यांतच,....तिनें पाहिलें....तिची आई त्यांच्या झोंपडींत असलेल्या फक्त दोनच मोडक्या तोडक्या खुर्च्या फरफटत बाहेर ओढत होती....नि तिला ओरडून सांगत होती—"हं....पलंग काढ बाहेर! पलंग!—"

पलंगावरचे कपडे वगैरे सर्व त्या मुलीनें सभोंवार सैरावैरा उडवले व तो जुनाट मोडका तोडका पलंग तिनें दाराजवळ आणला....तोंपर्यंत तिची आई रुळाजवळ खुर्च्या ठेऊन परत आली होती—

पलंग ओढूं लागत ती श्वास टाकून घाईघाईनें म्हणाली–"चल पोरी–आतां फक्त पांच सात मिनिटेंच उरलीं आहेत! नाहीं तर भयंकर अनर्थ ओढवेल!"

त्या धीट प्रसंगवधानी बाईनें, आपल्या झोंपडींतील त्या मूल्यवान वस्तू–तो जुनाट, वाळवीनें सत्रा ठिकाणीं पोखरलेला पलंग नि त्या खुर्च्या–आपल्या थरथरत्या हातानें अतिशय चपळाईनें मोडून टाकल्या. त्यांचे तुकडे तुकडे केले....त्यांची अगदीं उंच रास केली.

आणि मग अगदीं घाईघाईनें त्या राशीला ठिकठिकाणीं आग लावून दिली. त्या जुनाट लांकडाचा जाळ धडधड पेटूं लागला; तेव्हांच कोठें तिचा चेहरा हसरा झाला. तिचा जीव थोडा खालीं पडला.

## ८

आणि त्याच वेळीं, लांबून धांवत येणाऱ्या गाडीचा आवाज तिच्या कानावर पडला. त्या भयाण काळोखांत गाडीच्या इंजनवरच्या दिव्याचा अंधुक प्रकाश फांकला—मायलेकींचे चेहरेही आपण कांहीं तरी वेळेवरच करूं शकलों या आनंदानें प्रकाशले होते.

गाडी वळणाजवळ येतांच, त्या मुलीनें हातांत एक जळतें लांकूड घेतलें. व तिच्या आईनें आपला ठेवणींतला किंमतवान् तांबडा झगा हातांत घेऊन, तो उजेडाजवळ धरला,--व त्या दोघी ओरडवेल तेवढ्या मोठ्यानें ओरडूं लागल्या--" थांबा ! थांबा !....धोका !....धोका....!! "

त्या रुळावरच्या जाळानें, त्या हलणाऱ्या तांबड्या झग्यानें व तसल्या काळोखांत भुताटकीप्रमाणें वावरणाऱ्या त्या दोघींच्या चमत्कारिक हालचालींमुळें गाडीच्या ड्रायव्हरनें दचकून पुढें पाहिलें—वेग कमी कमी केला....व शेवटीं अगदी जाळाजवळ येऊन गाडी थांबली....

आणि मगच कोठें त्यांना त्यांचा टळलेला भयंकर धोका पूर्णपणें व प्रत्यक्ष समजून आला !

आणि त्या धोक्यांतून, केवळ प्रसंगावधानानें व सर्वस्वाच्या त्यागानें गाडीतील सर्वांना वांचवणाऱ्या त्या दरिद्री मायलेकींच्या मनोधर्याचें व समाजसेवेचे कृतज्ञ कौतुक वाटलें !

---

# ५–प्रसंगावधानी पोर....

वसंत ऋतूंतील झगझगीत दुपार. पेन्सिल्व्हानिआच्या एका अरण्यांत, कांहीं तरुण मुलामुलींचा घोळका वनभोजनाला व जंगलफेरीला निघाला होता.

भोंवतीं अगदीं शांत असल्यामुळें त्या अरण्यांत त्यांच्या हसण्या-खिदळण्याचे व बडबडीचे आवाज दुमदुमत होते.

इतक्यांत, त्यांचें असें ठरलें, कीं, आपापल्या आवडीप्रमाणें कोणी फुलें गोळा करावयाला जावें, कोणी पक्षांच्या मागें लागावें, मन मानेल



तसें स्वैर फिरावें जवळपास ! मात्र रॉक फॉल्स म्हणून जवळ लहानसा धबधबा होता, तेथें कांहीं वेळानें सर्वांनीं वनभोजनासाठीं जमायचें होतें.

२

साऱ्यांची पांगापांग झाली. नि अरण्य पुन्हां चोहूंबाजूला अगदीं निःशब्द झालें. मधूनच,....दूरची कुजबुज, एखाद्या स्वैर हास्याची अस्पष्ट लकेरी, झाडाच्या खांद्या तोडल्याचा आवाज, यांनीं शांतता मोडली जात होती तेवढीच !

इतक्यांत, एक भयानक किंकाळी त्या वातावरणांत दुमदुमली. ती पांगलेल्या साऱ्यांच्या कानावर आदळतांच, त्यांच्या अंगावर कांटा उभा राहिला. तत्काळ, आपल्यांतल्याच कोणी तरी ती किंकाळी फोडली असावी याची जाणीव होऊन, प्रत्येकजण निरनिराळ्या बाजूंनीं त्या एकाच दिशेला धांवला.

त्यांच्यातला **बिली** कांहीं रंगबिरंगी फुलें व नेच्यांचीं पानें गोळा करीत होता. आणि–एका नेच्याच्या बेटाजवळ तो आपला हात घट्ट धरून उभा होता. त्याचा चेहरा भीतीनें पांढरा फटफटीत झाला होता.

सगळे लगबगीनें त्याच्या भोंवतीं जमले. आला कीं प्रत्येकजण त्याला एकच प्रश्न विचारी–" काय झालं रे ?–काय झालं ?? "

उत्तरासाठीं उत्सुक झालेलीं सारीं मुलें **बिली**कडे पहात त्याच्या भोंवतीं गप्प उभी राहिलीं. तेवढ्यांत, त्यांच्या कानावर जवळूनच मंद धावती सळसळ पडली. आणि त्या दिशेकडे बोट दाखवून बिली भेदरल्या स्वरांत ओरडला, " साप ! साप !–मला चावला तो !—"

३

" काय ?? " साऱ्यांच्या तोंडून एकदम शब्द बाहेर पडले.

मुली भीतीनें ओरडल्या. कांहीं रडूं लागल्या !–मुलांनीं त्या दिशेला धांव ठोकली. त्या झाडाझुडुपांतून त्या सापाला शोधलें. नि

काठयांनीं त्याला ठेंचून काढला. आणि शेवटीं मोठया समाधानानें ते परत फिरले.

पण सर्वांत शेवटीं बिलीजवळ येऊन पोहोंचले. वीस वर्षांचा **मेरी बेटन**चा चेहरा त्यांना क्षणभर भेदरलेला दिसला. तिच्या चेहेऱ्यावर त्या साऱ्यांबद्दलचा राग स्पष्ट दिसत होता.

ते सारेच त्या चमत्कारिक परिस्थितीनें गोंधळले होते; **मेरी** भानावर येऊन कार्याला लागली. ती एकदम ओरडली–" चल **बिली** ! आधीं पटकन् कोट काढ तुझा !—"

भेदरलेल्या **बिली**नें यंत्राप्रमाणें तिचा हुकूम पाळला. बाकीचे सारे त्या दोघांकडे टकमका पहातच राहिले. 'आपलं कांहीं चुकलं कीं काय ?' असें त्यांना वाटत होतें.

## ४

**मेरी बेन्टन**नें **बिली**चा हात धरला. त्याचा सदरा चपळाईनें कोपराजवळ टरकन् फाडला. तेथें सापानें रोंवलेले दोन दांत व वर रक्ताचे दोन डाग दिसत होते.

सगळे अधिकच घाबरले होते. **बिली** बिचारा केविलवाण्या नजरेनें सर्वांकडे आलटून पालटून पहात होता.

कांहीं मुली रडूं लागल्या, "काय करणार आहेस, **मेरी** ?"

कांहीं हुंदके देत तिला सर्व विचारूं लागल्या.

"माझे आई !—गप्प बसा जरा रडूबाई !—" **मेरी** अर्धवट रागानें म्हणाली—"निमूट पहा मी काय करतें तें ! तुम्हाला कोणाला कांहीं सुचत नसेल तर निदान बाजूला जाऊन बसा !–एवढे तरी उपकार करा माझ्यावर ! !"

असें म्हणून **मेरी बेन्टन**नें एका हातरुमालानें **बिली**च्या कोंपराजवळ घट्ट बांधलें. आपले ओंठ त्या जखमेला लावले नि ती जागा ती जोराजोरानें चोखूं-शोषूं लागली.



## ५

तेवढ्यांत मुलांनीं आपली गाडी जोडली. दोन मुली धांवत धांवत शेजारच्या शेतकऱ्याकडे निरोप घेऊन गेल्या. तेथून त्यांनीं गांवाकडे टेलिफोन पाठवून डॉक्टरला बोलवायचें ठरवलें होतें.

**मेरी** तर **बिली**ची जखम सारखी शोषतच होती. शेवटीं, गाडी तयार होतांच त्यांत तिनें **बिली**ला घातलें व ती म्हणाली–"घाबरूं नकोस हं आतां, **बिली** ! कांहीं होणार नाहीं तुला !"

सर्वांची छाती अजून धडधडत होती. गाडी पुढें चालली होती. दोनअडीच मैल वाट चाल होत आहे, तोंच डॉक्टरची मोटर त्यांना रस्त्यांत भेटली.

सर्वांच्या जिवांत थोडा जीव आला !

डॉ. **मेल्यूंनी** भरभर प्रश्न विचारले. **मेरी**नेंच सारीं उत्तरें दिलीं. प्रथम डॉक्टरांचा चेहराही घाबरलेला दिसत होता. पण शेवटीं, तो पालटत पालटत शांत झाला. त्यांच्या चेहऱ्यावर गंभीर स्मित झळकलें.

सर्वजण डॉक्टरकडे आशेनें पहात होते. ते पुढील व्यवस्थेला लागतां-लागतां **मेरीला** म्हणाले–"तुझ्या प्रसंगावधानानें, तत्काळ केलेल्या उपाया-मुळेंच **बिली** वांचला !—तूंच **बिली**ला प्राणदान केलेस ! तो ओठावर फोड कसला तुझ्या, **मेरी** ?....पाहिलंस ?—तूं आपला जीव धोक्यांत घातला होतास !—जाणीव होती का तुला त्याची ?—"

**मेरी**नें हळूच 'होय' अशी लाजत लाजत मान हलवली.

मघाची, प्रसंगीं सर्वांना दमांत घेणारी नि एकदम निर्णय ठरवून कार्याला लागणारी **मेरी** व आतांची लाजाळू **मेरी** यांत अगदीं जमीन अस्मानाचें अंतर होतें !

# ६—मेलेला कुत्रा....

**रॉबर्ट** एकदां दारु पिऊन धुंद झाला, कीं, त्याला साऱ्या जगाची शुद्ध नसे. पी पी चिक्कार प्यायचें नि शेवटीं लटपटतीं पावलें अडखळत अडखळत टाकत आपल्या एकाकी ओंगळ खोलींत रात्रींचें शिरायचें, हा त्याचा अगदीं नित्याचा नियम !—

घरांत तो एकटाच !—त्या दारुड्याजवळ सभ्य माणसें सहसा जात नसत. प्रत्येक जण त्याला टाळे. पण दिवसामागून दिवस, जणूं काय दारुच्या पिंपांतच बुडवून, तो एकलकोंडा तरुण **रॉबर्ट** आपलें आयुष्य व्यतीत करीत आला होता, व्यतीत करीत होता.

त्याच फ्रेंच गांवांत तसाच जगानें तुच्छ मानलेला दुसरा एक जीव आपलें जिणें कंठीत होता. तो एक मरतुकडा कुत्रा होता; **मुस्तफा** त्याचें नांव !

तो जातिवंत नव्हता. अगदीं लहान, हाडें बाहेर आलेला, रोडका असा होता. एवढेंच नव्हे तर तो एका पायानें लंगडा होता. त्याच्या अंगाला कोठें कोठें व्रूत लागलेली होती. एक डोळाही जवळ जवळ फुटला होता,....कोणाच्या तरी हातचा प्रसाद खाऊन. ना धनी ना घर....त्याची निगा राखतो कोण ?....आणि असल्या घाणेरड्या कुत्तरड्याचें धनीपण नव्यानें स्वीकारण्याची इच्छा तरी कोणाला होणार ?—

असले हे दोन्ही दुर्लक्षित एकाकी जीव **एकाच हावर** गांवीं आपल्या आयुष्याचे उरले सुरले क्षण मोजीत होते.

## २

एके रात्रीं **रॉबर्ट** खूप पिऊन, धुंद होऊन, आपल्या खोलीकडे झिंगत झिंगत परतत होता.



रस्त्यांत खूपच काळोख होता. पण नेहमीच्या सरावाप्रमाणें तो वळणामागून वळणें घेत, आपला घरचा रस्ता झोकांड्या खातच आक्रमित होता.

त्याचे तारकटलेले डोळे, रस्त्यांतून जात असतां, इकडे तिकडे गरगर फिरत होते. तोंच त्याच्या दृष्टीस थंडीनें कुडकुडत असलेला, आसरा मिळेल तर पहात असलेला एक मरतुकडा कुत्रा दिसला.

हो, तो **मुस्तफाच** होता. त्याची ती स्थिती पाहून **रॉबर्ट** जागच्या जागीं थबकला.

**रॉबर्ट** दारुड्या असला तरी त्याचें हृदय मेणाहून मऊ होतें. अगदीं दारुच्या तारेंतही त्याला **मुस्तफा**ची दया आली. त्या एकाकी बेवारशी कुत्तरड्याला त्यानें खालीं वांकून वर उचललें. आणि आपल्या बरोबर आपल्या घरीं नेऊन त्याला तेथें आसरा दिला.

दारुच्या धुंदींतही त्याचें हृदय जागें होतें. त्यानें **मुस्ताफा**च्या साऱ्या जखमा साफ धुतल्या. आणि घरांत सांपडल्या त्या चिंध्यांनीं त्या बांधून टाकल्या.

आपल्यावर झालेल्या या अनपेक्षित दयेच्या वर्षावानें **मुस्ताफा**चा जीव जणूं अधिकच कासावीस झाला. आपली मान खालीं घालून, आणि आपली बिनकेसाची शेंपटी पुन्हा पुन्हा हलवून, त्यानें आपल्या मनांतले ते कृतज्ञ भाव थोडथोडे व्यक्त केले.

तरी पण आपल्या या नवख्या मालकाच्या....हितचिंतकाच्या हाताला प्रेमानें चाटण्याची कांहीं त्याची छाती झाली नाहीं !—

## ३

दुसऱ्या दिवशीं सकाळीं, **रॉबर्ट** आपल्या दारुच्या धुंद झोंपेंतून जागा झाला; आतां तो खरा भानावर आला होता.

त्यानें बिछान्यांतून मान वर करून पाहिलें; तों **मुस्ताफा** त्याच्या पायाजवळ त्याच्याचकडे टक लाऊन, त्याच्या उठण्याचीच वाट पहात बसलेला त्याला दिसला.

अंगाला, डोक्याला, चिंध्यांच्या पट्ट्या बांधलेला तो नवखा कुत्रा आपल्या खोलींत पहातांच, **रॉबर्ट** प्रथम केवढ्यानें तरी दचकला. पण मग, त्याला आधल्या रात्रीं रस्त्यांत घडलेलें सारें आठवलें.

तो पटकन् उठला. त्यानें आपल्या खोलीचा दरवाजा उघडला. व **मुस्ताफा**कडे पाहून त्यानें त्याला हातानें बाहेर जाण्याची खूण केली.

पण **मुस्ताफा** जागचा हलला नाहीं. उलट, तो त्याच्याकडे केविलवाण्या नजरेनें वर पाहूं लागला.

त्याच्या दृष्टींत जणूं भाव दिसत होता—"नका ना धनी, मला या जगांत कुठेंच घर नाहीं! वितभरही थारा नाहीं!–तुम्ही म्हणतां खरं 'जा!' पण मी आतां जाऊं तरी कुठें!–तुमच्या केराच्या कोंपऱ्यांत पाहिजे तर पडून राहीन मी!–पण एकदां मिळालेल्या या घरांतून मला आतां हांकलून देऊं नका!–दया करा!"

**रॉबर्ट**चें हृदय विरघळलें. त्यानें आपला पहिला बेत बदलला. उघडलेला दरवाजा बंद करून तो **मुस्ताफा**जवळ गेला. त्यानें त्याच्या पाठीवर हळूंच एकदां प्रेमानें थोपटलें व मग जणूं कांहीं एक झालेंच नाहीं अशा प्रकारें तो आपल्या नित्यक्रमाला लागला.

## ४

यानंतर दोन वर्षें **मुस्ताफा** व **रॉबर्ट** यांची ही योगायोगानें झालेली ओळख व मैत्री चालूच होती.

वास्तविक, त्या दोघांत जमीन अस्मानाचें अंतर होतें. पण **रॉबर्ट**नें **मुस्ताफा**ला आपल्यावर प्रेम करण्याची पूर्ण परवानगी दिली होती व **मुस्ताफा**ला जगांत दुसरें ठिकाणच नव्हतें.



परिस्थितीनें मुके जीवसुद्धां शहाणे होतात. **मुस्ताफा**नेंही आपली परिस्थिति ओळखली होती.

त्यानें आपल्या धन्याकडे कधीं सुद्धां कसली मागणी केली नाहीं. **रॉबर्ट**नें आपल्याला थोपटावें, आपल्याला जवळ घ्यावें, आपल्याला निरनिराळे कांहीं खायला घालावें, आपले चोचले करावेत, असें त्यानें कधींच मनांत आणलें नाहीं. **रॉबर्ट** जे व जेवढे तुकडे त्याच्यापुढें टाकील ते व तेवढेच तो खात असे. तो सांगेल तेथें आज्ञाधारकपणें बसत असे.

थोडक्यांत,....तो अत्यंत चाणाक्षपणें मिळेल तेवढ्यांत संतुष्ट राहून त्या चार भिंतीच्या आसऱ्याला धरून राहिला होता.

## ५

पण मग एक भयंकरच घटना घडली.

**मुस्ताफा** आधींच मरतुकडा; त्यांत आणखी त्याला भयंकरच लूत लागली.

त्याच्या त्या दुःखाकडे व त्या परिस्थितीकडे **रॉबर्ट**ला पहावेना. त्याला फार वाईट वाटलें खरें. पण त्याबाबतींत त्याला कांहींच करतां येणें शक्य नव्हते. **हावर** गांवीं कुत्र्यांचा दवाखानाही नव्हता. व **रॉबर्ट** हा कांहीं मोठा श्रीमंत नव्हता.

शेवटीं, त्यानें केवळ दयेनेंच प्रेरित होऊन ठरविलें, कीं, **मुस्ताफा**ला समुद्रांत बुडवून टाकावें.

## ६

काळोखी रात्र होईपर्यंत **रॉबर्ट** थांबला. त्यानें **मुस्ताफा**ला उचललें व तो समुद्रावर आला. आणि गोदीच्या एका टोंकाजवळच्या पायऱ्या उतरून तो समुद्राच्या तुफान लाटांसमोर उभा राहिला.

निळसर लाटा किनाऱ्याच्या पायऱ्याजवळ येऊन फुटत होत्या व फसफसून फेंस येत होता. गंभीर भयानक नाद चोंहूंबाजूस सारखा दुमदुमत होता.

रॉबर्टनें जिवावर उदार होऊन एक मोठा दगड घेतला. दोरीनें बांधला व ती दोरी दगडासह मुस्ताफाच्या मानेला घट्ट बांधली.

पण एवढं झालं, तरी मुस्ताफाच्या तोंडून जरा देखील आवाज आला नाहीं. त्यानें थोडी देखील हालचाल केली नाहीं.

“आपल्या धन्यानें आतांपर्यंत आपल्या हितासाठीं पुष्कळ केलें. आतांही तो आपल्या हितासाठींच हें करीत असेल. करूं दे...जें नशीबीं असेल तें होईल!” असाच भाव त्याच्या त्या दृष्टींत त्यावेळीं दिसला असता कोणालाही!—

७

तेवढ्यांतच, रॉबर्टनें मनाचा मोठा धडा करून मुस्ताफाला समुद्राच्या तुफाट लाटांत दूर भिरकावून दिलें.

....मुस्ताफाचें इवलेंसें शरीर त्या उसळत्या लाटांवर आपटल्याचा एक सूक्ष्म आवाज तेवढा एकदां आला. आणि मग पुन्हां शांत झालें!—

मुस्ताफाला फेंकून दिल्यानंतर मात्र रॉबर्टला मनांतल्या मनांत खूप लाज वाटली. अगदीं मेल्याहून मेलें झालें!

आणि त्या विचारांतच मुस्ताफाचें काय झालें हें पहाण्यासाठीं तो जरा पुढें वांकला. तेवढ्यांतच जोराचा वारा आला आणि त्या झोतानें त्याच्या डोक्यावरची कशिदा केलेली टोपी एकदम पाण्यांत उडाली.

रॉबर्ट एकदम दचकला. त्याला फारच वाईट वाटलें. कारण, ती टोपी म्हणजे त्याच्या एका आवडत्या माणसानें त्याला दिलेली एक प्रेमाची स्मृति होती.



मुस्ताफा गेल्याच्या व त्याबरोबरच आपली आवडती टोपीही गेल्याच्या दुःखाचें उसासा टाकत, तो शेवटीं आपल्या घरीं परतला.

८

रॉबर्ट घरीं येऊन बिछान्यावर मनांतल्या दुःखानें विव्हळत पडण्याला एक तासभरही झाला नसेल, इतक्यांत त्याच्या खोलीच्या दरवाज्यावर नखांची खरखर त्याला ऐकूं येऊं लागली.

रॉबर्ट दचकून बिछान्यांतून उठला व दाराजवळ धांवला.

त्यानें दार उघडलें नि पाहिलें, तों मुस्ताफा दाराजवळ उभा..... नि त्याच्या तोंडांत रॉबर्टची आवडती टोपी!

मुस्ताफाचें सारें शरीर अगदीं रक्तबंबाळ झालें होतें. अंगांतून पाण्याच्या व रक्ताच्या धारा निघत होत्या. खालची फरशी सारी रक्तापाण्यानें ओलीचिंब झाली होती.

रॉबर्टचें हृदय पुन्हां भरून आलें. तो खालीं वांकला. त्यानें मुस्ताफाला तशाच स्थितींत जवळ घेतलें;....त्याला थोपटलें, त्याच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा निथळूं लागल्या!—

मुस्ताफानें रॉबर्टकडे एकदां प्रेमभरल्या डोळ्यानें वर वळून शेवटचें पाहिलें.

एक अगदीं सूक्ष्म चित्कार टाकला. आणि तसें पहातां पहातांच रॉबर्टच्या हातांत मान टाकून तो कायमचा झोंपी गेला!!—

---

# ७-तो बोलला नाहीं....

दोनशें वर्षांपूर्वीं फ्रान्समध्यें धार्मिक छळ फार होई. त्यावेळीं प्रॉटेस्टन्ट पंथाचे तेथील लोक ह्युगेनॉटस् म्हणून ओळखले जात. त्यांचा तर फार छळ होई.

**थोरें** गांवात **बोने** म्हणून एक विणकर रहात होता. बायको नि तीन मुलें, एवढाच त्याचा संसार. सर्वांत मोठा मुलगा फक्त पांच वर्षांचा होता.

त्या वेळच्या छळानें कंटाळून त्यानें अमेरिकेंत देशांतर करून जाणाऱ्या लोकांमध्यें सामील व्हायचें ठरवलें.

सर्व तयारी करून ते निघाले. पण पहाऱ्यांतून निसटतां यावें म्हणून त्यांनीं आपलीं मुलें गाढवावर ठेवून त्यावर भाजीपाल्याचे भारे रचले. आणि जणूं बाजाराकडे निघाल्यासारखेंच तें कुटुंब घरांतून बाहेर पडलें. कारण, ते अमेरिकेला जायला निघाले आहेत हें समजतें, तर त्यांना अटकाव झाला असता. त्यांचे अधिकच हाल झाले असते.

## २

थोडा रस्ता कांटून गेल्यावर वाटेंत त्यांना कांहीं पहारा करणारे सैनिक आडवे आले. त्यांना तर नेहमीचेच असले अनुभव; म्हणून पटकन् **बोने**चा संशय आला.

सैनिकांचा म्होरक्या कुचेष्टेनें हंसून म्हणाला, "बाजाराला चाललांत वाटतं, शेतकरीबुवा? मुलें-गाजरें असतील हीं गाढवावरचीं?— पहातों तरी कितीं कोवळीं आहेत गाजरें!"

असें म्हणून त्या सैनिकानें आपल्या हातांतील तरवार उपसून ती भाजीच्या भाऱ्यांत जोरानें आडवी खुपसली.

पण आंतून कसलाच आवाज आला नाहीं!

'आपली चूक झाली!' असें वाटतांच सैनिकांची ती टोळी झटकन् निघून गेली!—



## ३

तरवार खुपसतांच **बोने**च्या व त्याच्या बायकोच्या डोळ्यापुढें काजवे चमकले. पण करतात काय बिचारीं!—मध्यें रस्त्यांतच तर आंत मुलांना लागलें कीं काय, याचा तपास लावणें शक्य नव्हतें!—

दूर दूर गेल्यावर जवळपास कोणी नाहींसें पाहून **बोने**नें हळूच भाजीपाल्याचे भारे बाजूला करून धडधडत्या छातीनें आंत पाहिलें.

त्यांचा पांच वर्षांचा मुलगाही हसतमुखानें हळूंच वर वळून पहात होता.

त्याच्या मांडीला जखम झाली होती—रक्त वहात होतें.

पण तो आपल्या आईबापांकडे पहात अभिमानी स्मित करून म्हणाला—'आई, मी जरा देखील हूं कीं चूं केलें नाहीं!—हो कीं नाहीं?'

खरंच!—त्याच्या धीरामुळेंच सारें कुटुंब त्या दिवशीं जिवन्त राहिलें व मग अमेरिकेला जाऊन पोहोंचूं शकलें.

# ८ मृत्यूशीं शर्यत....

तें गांव नदीच्या तीरावर दरींतच वसलें होतें. कष्ट करणाऱ्या लोकांचें गांव होतें तें!—गांवाच्या अलीकडे कांहीं मैल अंतरावर धरण बांधलें होतें!—त्यामुळें गांवाला नेहमीं मदतच होई.

गेले कित्येक दिवस मुसळधार पाऊस पडत होता. नदी तुडुंब भरून चालली होती.

पण आज पाऊस थांबला होता. आकाश अगदीं निरभ्र होतें.

बऱ्याच दिवसांनीं सूर्य आपल्या तेजस्वी किरणांचाच सगळीकडे पाऊस पाडत होता.

लखलखीत ऊन, निरभ्र निळें आकाश नि भोवतालची ओली जमीन....मोठा गमतीचा देखावा होता तो !-बऱ्याच दिवसांच्या पावसाच्या धो धो वहाण्यानें कंटाळलेले लोक आज खुषींत होते.

मोठीं माणसें शेतांत कामाला लागलीं होतीं. लहान मुलेंमुली घरासमोरच्या आवारांत मजेनें खेळत होतीं. किंवा नदी कांठावर गप्पा गोष्टी करीत धांवत्या तुडुंब प्रवाहांत डुबुक डुबुक दगड टाकीत होतीं.

## २

इतक्यांत, गांवांतला प्रत्येक मोठा मनुष्य काम करतां करतां हात थांबवून थबकला. प्रत्येक बालक खेळतां खेळतां कान टवकारून चाहूल घेऊं लागलें.

लांबून, अगदीं लांबून, डोंगरापलीकडून 'घुं घुं' असा कसला तरी घुमणारा आवाज ऐकूं येत होता. तो प्रतिक्षण जवळ जवळच येत होता-

'काय असावें' याचा तर्क करतां येत नसूनही प्रत्येकाच्या काळजांत चर्र झालें !—

पण एवढें होत आहे, तोंच चौखूर धांवणाऱ्या घोड्याच्या बेफाम टापा त्यांच्या कानावर आदळूं लागल्या. सारीं हातचीं कामें जेथल्या तेथें टाकून प्रत्येक जण पुढें झाला. व त्या टापांच्या रोखानें दूरवर पाहूं लागला.

तेवढ्यांत त्या टापांबरोबरच त्यांना मोठमोठ्यानें ओरडलेल्या किंकाळ्याही ऐकूं येऊं लागल्या. आणि मिनिटभरांतच चौखूर धांवणारा व मोठमोठ्यानें ओरडणारा घोडेस्वार त्यांच्या रोखानेंच येत असलेला त्यांच्या दृष्टीस पडला !—



## ३

एका हातानें उधळणाऱ्या घोड्याची लगाम संभाळून तो दुसरा हात सैरावैरा हलवीत होता. आणि तोंडानें मोठमोठ्यानें ओरडत होता.

प्रथम कोणालाच त्याचे शब्द ऐकूं आले नाहींत. पण मग एकदम त्याची धांवती ओरड साऱ्यांनीं ऐकली—"पळा पळा !—जीव वचावा आपला !—त्या टेकड्यांकडे पळा !—उंचीवर चला !—आपला धरण फुटला आहे !—पाण्याचा पूर आपल्या बाजूला धांवत येत आहे !—टेकड्यांवर चढा !—टेकड्यांवर चढा ! ! ही मृत्यूशीं शर्यत आहे !"

तो घोडेस्वार साऱ्या दरीभर पसरलेल्या गांवात असेंच ओरडत दौडत गेला.

संकटानें भयभीत झालेले लोक जमेल तसें, वाट फुटेल तसे जवळ सांपडेल त्या टेकडीकडे धांवत सुटले. कोणी तेवढ्यांतल्या तेवढ्यांत माहीत नसेल त्याला ओरडून सांगितलें; कोणी बडबड न करतां कोणाला आपल्या बरोबर फरफटत टेकडीवर ओढत नेलें.

## ४

गांवांतला प्रत्येकजण जेमतेम उंचवट्यावर चढला असेल नसेल तोंच तो मघांचा घुं घुं करणारा आवाज भयानकपणें व जोरदारपणें पुढें पुढें आला....गढूळ काळ्यापाण्याचा भला मोठा लोंढा त्या घोडेस्वाराच्या पाठोपाठच थोड्या अंतरावरून त्या दरींतल्या गांवांकडे धांवत आला होता. आपल्या मार्गांत आलेलें सारें गांव–त्यांतलीं घरेंदारें–शेतें–तो पाण्याचा लोंढा उध्वस्त करून बुडवून टाकत होता.

आणि तो घोडेस्वार ?—त्याचें नांव होतें **कॉलिन्स**–तो जेमतेम गांवच्या टोकाजवळील एका टेकाडावर, आपल्या धुसफुसणाऱ्या घोड्यासह उभा राहिला. आणि त्याच वेळीं त्या गढूळ पाण्याच्या लोंढ्यांत सारें गांव साफ बुडालें.

**कॉलिन्सनें** मृत्यूशी केलेली जी शर्यत जिंकली.

आपल्याला सहज स्फूर्तीनें सुचलेल्या उपायानें सारें गांवांतील सारीं माणसें मृत्यूच्या जबड्यांतून वांचवली ! !—

———

# ९ आपलाच मुलगा !

गेल्या शतकांतली गोष्ट! **लबात** नांवाचा एक फ्रेंच व्यापारी आजारी झाल्यामुळें **आडोर** नदीच्या काठीं छानदार घरांत रहायला गेला होता.

तेथें रहात असतां, एके दिवशीं सकाळीं, त्याला नदीच्या पलीकडच्या तिरावर एक भयंकर दृश्य दिसलें. उधळलेल्या घोड्यावरून एक स्वार स्वतःला सांवरण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होता. जरा डोळे किलकिले करून तें दृश्य अधिक सूक्ष्मपणें **लबात** पाहूं लागला—तोंच त्या घोडयानें पाण्यांत शिरून त्या घोडेस्वाराला प्रवाहांत उडवून दिल्याचेंही त्याला दिसलें !—

## २

**लबात** एकदम दचकला.

पाण्यांत पडलेल्या घोडेस्वाराकडे त्याची सहानुभूती धांवली.

क्षणभरच तो गोंधळला; पण लागलीच आपलें उतार वय, आपला आजार, सारें विसरून **लबात**नें त्या घोडेस्वाराला वांचवण्यासाठीं तुडुंब वाहणाऱ्या नदींत उडी घेतली.

**लबात** स्वतः पट्टीचा उत्तम पोहणारा होता. पण तो जड कपडे घातलेला घोडेस्वार वांचवून तीरापर्यंत आणतां आणतां त्याच्या नाकीं नव आले.

शेवटीं, बऱ्याच धडपडीनंतर त्यानें त्या बुडत्या घोडेस्वाराला तीराला लावलें.

## ३

आणि तो त्या वांचवलेल्या घोडेस्वाराकडे पाहूं लागला. तों केवढें आश्चर्य !—तो **लबात**चा मुलगाच होता !—

आनंदानें सद्गदून तो म्हणाला—" अहाहा !.....केवढा प्रताप हा भूतदयेचा ?—मी माझ्या मुलाला वाचवलें ! !"

---

# शूरांचा गांव आणि इतर कथा–

### ( परिशिष्ट )

### १ भाषेचा अभ्यास.

**( अ ) कोणत्या नवीन शब्दांचे—कल्पनांचे अर्थ व उपयोग आपण शिकलों ?**

[ १ ] माणुसकी, आबालवृद्ध, मायावी, संचार, लागण, हाःहाःकार, सैरावैरा, रणकंदन, शिकस्त, पळपुटेपणा, खंबीर, संसर्ग, उध्वस्त, कवटाळणें, शिरकाव, तंतोतंत, कडेकोट, शाबूत, अजरामर, [ २ ] शिरसलामत, अफाट समुद्र, हासभास, जागरूक दक्षतेनें, अखंड धडधड, हृदयाचे लचके तोडणारी आग, सुखद, अथांग जलपृष्ठ, भरधांव शर्यत, लळलळत्या ज्वाला, हलकल्लोळ, दबला आवाज, वत्सल प्रेम, हवेंत विरणें, [ ३ ] सुरळीत, जाग, दबदबा धांवणें, ढिगला, भडका होणें, रोमांच, धडधडत्या छातीनें, अस्ताव्यस्त, धोकेबाज प्रयत्न, सुटकेचा सुस्कारा, खंबीर मनानें, भयानक अनर्थ, डगमगणें, गंडांतर, [ ४ ] वांकडें वळण, चढेल विजयी वेगानें, घमेंडखोरपणें धक्के देत, धडकी भरणें, घनदाट काळोख, भयसूचक संदेश, चेंदामेंदा, चक्काचूर, ईशारा देणें, उपेक्षित दुर्लक्षित जीव, गाडीची उद्दाम धडधड, अस्तित्व, अक्राळविक्राळ स्वरूप, ओरडा, भरभरणारा वारा, सर्पण, बकोटी, फरफटत, सर्वस्व, दरिद्री, कृतज्ञ कौतुक. [ ५ ] झगझगीत, पांगापांग, लकेरी, जमीन-अस्मानाचें अंतर. [ ६ ] चित्कार, ओंगळ, एकलकोंडा, मरतुकडा, रोडका, सराव, झोंकांड्या, तारकटलेले डोळे, आसरा, दारुची तार, अनपेक्षित दयेचा वर्षाव, कासावीस, धुंद झोंप, केविलवाणी नजर, वितभर थारा, तुफान लाटा, भिरकावणें, वाऱ्याचा झोत, प्रेमाची स्मृति, नखांची खरखर. [ ७ ] अटकाव, खुपसणें, अभिमानी स्मित. [ ८ ] रखरखीत, प्रतिक्षण, बेफाम टांपा, मृत्यूशीं शर्यत, सहजस्फूर्तीनें, मृत्यूच्या जबड्यांत [ ९ ] पट्टीचा पोहणारा, भूतदया

**( आ ) कोणते वाक्प्रचार-म्हणी आपण शिकलों ?**

[ १ ] शब्द वरच्यावर झेलणें, शहराला स्मशानाचें स्वरूप येणें, अर्थाअर्थी संबंध नसणें, धीर खचणें, मनांत वादळ उठणें, विचारांचें घनघोर युद्ध होणें, बळकट ठाणें देणें, शब्द उचलून धरणें, एकमेकांचे गळे कापणें, [ २ ] हजारों योजनें खालीं घरंगळत गेल्याचा भास होणें, आनंद गगनांत न मावणें, ठिकऱ्या ठिकऱ्या होणें, [ ३ ] एखाद्याच्या अंगावर सोंपवणें, कशाचा–कोणाचा मागमूस न उरणें. [ ४ ] एखाद्याची कदर न करणें, एखाद्याला कस्पटाप्रमाणें तुडवणें, सांजा काळवंडणें, कसा-

रघुवीर सामंत संपादित

# अमर

## — ज्योति वाङ्मय —

* नव्या दृष्टीचीं, नव्या पद्धतीचीं, हीं नवीं विविध पुस्तकें आपल्या मुलामुलींच्या हातीं द्या !—
* तीं त्यांची करमणूक करतीलच; पण त्याबरोबरच त्यांना अधिक रसिक बनवतील !—
* हीं व असलीं पद्धतशीर पुस्तकें अव्याहत प्रकाशित करण्यास साहाय्य करण्यासाठीं, या प्रकाशन-संस्थेचे, फक्त चार आणे भरून व रु. चारचीं सवलतीनें पुस्तकें घेऊन कायम ग्राहक व्हा. ग्राहकांना दर दिवाळींत प्रसिद्ध होणारीं (सर्व अगर रु. ४ चीं) पुस्तकें विशेष सवलतीनें मिळत जातील.

### प्रथम वर्षांतील

१२—दीपावली-प्रकाशनें—१२

[ मनोरंजन विभाग ]

I न्याय-चातुर्य-कथा
( किशोर श्रेणी )
१ मडक्यांतला न्याय आणि इतर कथा
२ नशिबाची परीक्षा आणि इतर कथा
३ जलदेवतेचा न्याय आणि इतर कथा
४ अजिंक्य पंडित आणि इतर कथा

II सत्यकथा—
( कुमार श्रेणी )
१ कड्यावरील गाडी आणि इतर कथा
२ शूरांचा गांव आणि इतर कथा

III अभिनय-गीतें
( किशोर श्रेणी )
१ गीत ज्योती

IV दीर्घ-कथा
१ कांहीं कमळें

V मोठ्यांच्या छोट्या गोष्टी
( कुमार श्रेणी )
१ चार वीर
२ 'प्रफुल्लचंद्र'

[ ज्ञान विभाग ]

| VI शास्त्रीय कुतूहल. | कुमार | VII वाङ्मयीन चर्चा. |
|---|---|---|
| १ माणसाचें शेंपूट. | श्रेणी | १ 'मी लेखक होणार.' |

खानविलकर लिथो प्रेस; मुंबई २.